दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २६७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२२ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# लोकनेते रामशेठ ठाकूर भवनाचे खा.शरद पवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारलेल्या 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' चे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. सोमवार दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११ वाजता हा समारंभ संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून व्हाईस चेअरमन ऍड. भगीरथ शिंदे, राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील तसेच रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर उपस्थित राहणार आहेत.






लोकनेते रामशेठ ठाकूर यांची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था हि स्वतःची शैक्षणिक संस्था असली तरी त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर त्यांचे जीवापाड प्रेम आहे, त्यामुळे रयत संस्थेला मातृसंस्था मानून ते सदैव कार्यरत आहेत. रयत शिक्षण संस्थेला जेव्हा-जेव्हा गरज पडली तेव्हा लोकनेते रामशेठ ठाकूर मदतीला धावून आले. रयतेच्या विकासात त्यांचा मोलाचा वाटा आहे हे सर्वश्रुत आहे. चांगले विचार स्वतः आणि इतरांना घडविण्याचे काम करते. जन्माला येताना आणि मृत्यूनंतर खाली हात जावे लागते. माणुसकी आणि विचार अमर असतात, शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या विकासासाठी सर्वानी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून देणे गरजेचे आहे, या सामाजिक भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबिय कार्य करीत आहेत. रयत आणि ठाकूर कुटुंबिय यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे.

तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचले यासाठी कर्मवीर अण्णांनी केलेले कार्य पुढे नेण्याचे काम रयत सेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर सतत करीत आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या विकासात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे योगदान अनन्य साधारण आहे. मानवता सेवा आणि स्वावलंबनाचे बाळकडू सातारा येथील शिवाजी कॉलेज येथे शिकताना 'कमवा आणि शिका' या योजनेत त्यांना मिळाले होते. आणि त्याचा त्यांना कधीही विसर पडला नाही. त्यामुळे रयतेच्या सेवेसाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' उभारण्यात आले आहे. या सोहळ्यास रयतप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी केले आहे.

# विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरऐवजी मुंबईत : उपमुख्यमंत्री






**दै.रायगड नगरी । मुंबई**

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरू होत आहे. हिवाळी अधिवेशन यंदा नागपुरात का घेण्यात आले नाही, याचे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची प्रकृती उत्तम असली तरी मुख्यमंत्र्याना प्रवासाची मर्यादा असल्याने यंदाचे हिवाळी अधिवेशन नागपूरला न घेता ते मुंबईत घेण्याचा निर्णय झाल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. या निर्णयाला विरोधी पक्षाने देखील पाठिंबा दिल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले. मात्र पुढील अधिवेशन नागपुरात घ्यावे असे सत्ताधारी पक्षातील सहकाऱ्याबरोबरच विरोधी पक्षाने देखील मागणी केली असून त्याबाबत सरकार लवकरच निर्णय घेणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

आज मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार प्रसारमाध्यमांशी बोलत होते. या वेळी पवार यांनी अधिवेशनाच्या कालावधीबाबत स्पष्टीकरण दिले. अधिवेशनाचा कालावधी कमी असल्याबाबत विरोधक टीका करत आहेत. मात्र, सध्या राज्यावर करोनाचे संकट आहे. याचा विचार करून गर्दी टाळावी यासाठी हा निर्णय घेतला गेल्याचे पवार म्हणाले. देशातील इतर राज्यांमधील अधिवेशनाच्या कालावधीबाबतही आम्ही माहिती घेतल्याचे पवार म्हणाले.

या अधिवेशनात अनेक महत्वाची विधेयक मंजूर करून घ्यायची असून या अधिवेशनाचा कालावधी वाढवायचा का याबाबत कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल, असे पवार म्हणाले. येत्या शुक्रवारी कामकाज सल्लागार समितीची बैठक होत असून त्या बैठकीत अधिवेशनाच्या कालावधीबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

या अधिवेशनात विरोधकांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्यास सरकार तयार असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले. या अधिवेशनात करोनाचे संकट, एसटी कर्मचाऱ्यांचा संप, परीक्षा घोटाळा, वीजबिलाचा मुद्दा आणि शक्ती विधेयकाला मंजुरी असे अनेक महत्वाचे मुद्दे चर्चेला येत आहेत.गेल्या वेळेची ५ प्रलंबित विधेयके आणि नवी २१ विधेयके अशी एकूण २६ विधेयकं या अधिवेशनात मंजूर करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

# तळा नगरपंचायतीच्या दिग्गज उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद ; ७३.८२% मतदान

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीच्या निवडणूकीकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागून राहीले आहे. राज्यातील १०५ नगरपंचायतीच्या निवडणुका आज २१ डिसेंबर २१ रोजी होत असून रायगडातील सहा नगरपंचायती पैकी पाली सुधागड नव निर्मिती झाली आहे. तळा माणगांव, पोलादपूर, खालापूर म्हसळा या नगरपंचायतीच्या दुसऱ्यांदा होत आहेत. तळा नगरपंचायत हि शिवसेना पक्षाकडे आहे एकूण मतदार ५९२९ असून स्त्री मतदार २९१९ व पुरूष ३०१० मतदार आहेत.

१७ प्रभागापैकी १२ प्रभागात निवडणूक होत आहे. शिवसेना ११ राष्ट्रवादी ९ भाजप ४ शेकाप २ मनसे ३ बहुजन वंचित आघाडी १ बहुजन समाजपार्टी १ .../२

## संक्षिप्त...

### आ.रवींद्र वायकर यांची ईडीकडून चौकशी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे विश्वासातील समजले जाणारे शिवसेनेचे आमदार, माजी राज्यमंत्री रवींद्र वायकर यांची आज ईडीकडून तब्बल आठ तास चौकशी करण्यात आली. हा मुख्यमंत्र्यांना धक्का असल्याचे मानले जात आहे. वायकर यांची नेमकी कोणत्या प्रकरणात चौकशी करण्यात आली त्या बाबत मात्र समजू शकलेले नाही. मात्र, त्यांची वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये चौकशी सुरू असल्याचे बोलले जात आहे.

प्रताप सरनाईक, अनिल देशमुख, अजित पवार यांचे नातेवाईक, हसन मुश्रीफ, भावना गवळी,अर्जुन खोतकर आणि प्राजक्त तनपुरे यांच्या नंतर ईडीने आता आपला मोर्चा आमदार रवींद्र वायकर यांच्याकडे वळवला आहे. वायकर यांना ईडीने वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये समन्स बजावल्यानंतर ते आज ईडीच्या कार्यालयात चौकशीसाठी हजर राहिले होते. आज ईडीने त्यांना आठ तास प्रश्न विचारले. वायकर यांच्या चौकशीबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. त्यामुळे ईडीच्या अधिकाऱ्यांनी वायकर यांना नेमके कोणते प्रश्न विचारले, किंवा त्यांची आज कोणत्या प्रकरणात चौकशी केली हे समजू शकलेले नाही. आजच्या चौकशीनंतर वायकर यांना पुन्हा चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे का, याबाबतही माहिती मिळू शकलेली नाही. आमदार रवींद्र वायकर यांच्या चौकशीनंतर राजकीय वर्तुळातउलट सुलट चर्चा रंगलेल्या पाहायला मिळत आहे. आमदार रवींद्र वायकर हे मंत्री आणि मुंबई महानगरपालिकेत तब्बल १५ वर्षे स्टँडिंग कमिटीचे चेअरमन राहिलेले आहेत. सध्या ते मुंबईच्या पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतात. ते मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे अतिशय जवळचे मानले जातात.

# नागोठण्यात ७६ टक्के मतदान

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ५ मधील रिक्त झालेल्या एक जागेसाठी आज पोटनिवडणुक घेण्यात आली. शिवसेनेचे संजय पिंपळे विरूद्ध राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश पिंपळे यांच्यात होणाऱ्या सरळ लढतीत दोन्ही उमेदवारांचे भवितव्य आज मतदान यंत्रात बंद झाले आहे. नागोठण्यातील या पोटनिवडणुकीत ७६ टक्के मतदान झाले आहे. त्यामुळे या निवडणुकीत कोणाची लॉटरी लागणार ते उदयाच कळणार असल्याने सर्वांची उत्कंठा शिगेला पोचली आहे.

दरम्यान कचेरी शाळेतील मतदान केंद्रातील दोन्ही बुथवर मतदानाच्या अंतिम वेळेपर्यंत १३०७ मतदारांपैकी सुमारे ९८५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. नागोठणे ग्रामपंचायतीच्या या पोटनिवडणुकीमध्ये उत्स्फूर्तपणे मतदान झाले असल्याने प्रभाग क्रमांक ५ मधील निवडणूक निकालाकडे मतदारांसह विभागातील नागरिकांची उत्कंठा शिगेला पोचली आहे.

# स्वामी नित्यानंद मार्ग रस्त्याच्या कॉंक्रीट रोड होण्यास महानगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता, विरोधी पक्षाच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १८ मधील स्वामी नित्यानंद मार्ग रस्त्याच्या कॉंक्रीट रोड गार्डन हॉटेल ते पनवेल महानगरपालिका मुख्यालय या दोन्ही बाजूस रस्ता रुंदीकरण सह पावसाळी गटार बांधणे फुटपाथ बांधणे आणि इतर अनुषंगिक कामे करणे या कामास पनवेल महानगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाली आहे.



या कामासंदर्भात पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते माननीय श्री प्रीतम जनार्दन म्हात्रे नगरसेविका सुरेखा विलास मोहोकर, नगरसेविका प्रीती जॉर्ज, नगरसेविका सारिका भगत यांनी पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यापासून सातत्याने पाठपुरावा केलेला आहे.

पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १८ मध्ये स्वामी नित्यानंद रोडवरील कॉंक्रीट रोड येथील गार्डन हॉटेल ते पनवेल महानगरपालिका मुख्यालय पर्यंतचे रस्त्याचे कॉंक्रिटीकरण झालेले आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरण करून दोन्ही बाजूस पावसाळी गटार बांधणे फुटपाट बांधणे हे काम बाकी आहे सदर कामासाठी लागणाऱ्या जागेची भूसंपादन काम नगर रचना विभाग यांच्यामार्फत सुरू आहे नगररचना विभागाने दोन्ही बाजूस पावसाळी गटार बांधणे, फुटपाथ बांधणे आणि इतर अनुषंगिक कामे करणे हे काम सुरू .../२

# दारे, खिडक्या बंद करून आणि डिझेलचा शिडकावा करीत घर जाळण्याचा अयशस्वी प्रयत्न

**दै.रायगड नगरी । खोपोली**

रात्रीच्या सुमारास बाहेरून दारे, खिडक्या बंद करून आणि डिझेलचा शिडकावा करीत घर जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना सुभाषनगर येथे घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की, खोपोली सुभाष नगर येथील गणेश मंदिर परिसरात अनिकेत आनंदराव खेडकर (वय-२६) हे लहान भाऊ अक्षय (वय-२३) व आई हेमलता खेडकर (४७) यांच्यासह राहतात. सोमवार (दि. २०) रोजी रात्री दोन-अडीच वाजेच्या सुमारास त्यांच्या घराला बाहेर कडी लावून डिझेलचा शिडकावा करीत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. हल्लेखोरांनी आजूबाजूच्या घरांनाही बाहेरून बंद केले, तसेच गणेश मंदिरातील लाईट बंद करून खिड़की, दरवाजे व भिंतीवर डिझेल तसेच शेजाऱ्यांचे बाहेर वाळत टाकलेले कपडे यांना आग लावून घर जाळण्याचा प्रयत्न केला. या आगीत मागच्या बाजूचा दरवाजा काही प्रमाणात जळाला आहे. ऐवढेच नव्हे तर खिडक्यावर जळालेले कपडे, तसेच डिझेलचे डाग दिसून येत आहेत.

खेडकर कुटुंबीय आत झोपले होते. दरम्यान, काही अंतरावरील शेजाऱ्यांनी आग पाहून गोंधळ केल्यावर आजूबाजूचे लोक जागी झाले व त्यांनी आग विझवली, तसेच खेडकर कुटुंबियांना घराबाहेर काढण्यात. सुदैवाने यात जिवितहानी झाली नसली तरी सुभाषनगर परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. आरोपीला शोधून कारवाई करावी, अशी मागणी अनिकेत खेडकर व परिसरातील नागरिकांनी केली आहे.

सुभाषनगर येथील घराला जाळण्याचा प्रयत्न झाल्यानंतर नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, परिसरात सीसीटीव्ही लावण्यात याव्यात. सुभाषनगर परिसरात गांजा व दारूच्या नशेतील युवक रात्री २-३ वाजेपर्यंत फिरतात. सुभाषनगरात काही ठिकाणी गांजाडींचा अड्डा असून मस्को कंपनीच्या बंद पडलेल्या इमारती व डोंगर भागात दारू व गांज्याच्या पार्ट्या झोडल्या जातात. सुभाषनगरात अवैधधंद्यांना देखील ऊत आला आहे. तरी पोलीस प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये नियम मोडणाऱ्या २६५ रिक्षांवर कारवाईचा बडगा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६५ रिक्षा वाहनांवर वाहतूक विभागाच्यावतीने कारवाया करण्यात आल्या. नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या सूचनेनुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विना गणवेश, विना बॅच, पुढील सीटवर प्रवासी बसवणे याप्रमाणे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाया करण्यात आल्या. एका बैठकीत कारवाईची पूर्व सूचना देऊनही रिक्षाचालकांकडून .../२

> रिक्षाचालकांनी वाहतुकीच्या सर्व नियमांचे पालन करावे. गाडीचे पेपर वेळेत पूर्ण करून घ्यावेत. व्यसन करून कधीही वाहन चालवू नका. आरटीओच्या दंडाच्या रक्कमेत देखील भरमसाठ वाढ झालेली आहे. त्यामुळे रिक्षा चालकांना भूर्दंड बसू नये याउद्देशाने सर्व रिक्षाचालकांना आवाहन करण्यात येते की, यापुढेही अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असून रिक्षाचालकांनी सतर्क राहावे आणि नियमांचे पालन करून वाहतूक विभागालाही सहकार्य करावे.
>
> **- संजय नाळे (पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक)**

# पोलादपूर नगरपंचायतीच्या १३ प्रभागांच्या निवडणुकीसाठी ७१.०९ टक्के मतदान

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील १३ प्रभागांच्या मतदान प्रक्रियेमध्ये ७१.०९ टक्के मतदान झाल्याची अधिकृत माहिती निवडणुक विभागाने दिली आहे. दरम्यान, माजी सभापती दिलीप भागवत यांच्यासह माजी नगराध्यक्ष नागेश पवार, सुनीता पार्टे यांच भवितव्य इव्हिएममध्ये बंद झाले असून ४ प्रभागांच्या निवडणुकांनंतर मतमोजणी होणार असल्याने आता नव्याने निवडणुकीचे वातावरण तापणार आहे.

पोलादपूर नगरपंचायतीची १७ प्रभागांची एकूण मतदार संख्या ४ हजार ७९९ असून यामध्ये एकूण २३०० पुरूष आणि २४९९ महिला मतदारांचा समावेश आहे. मात्र, १३ प्रभागांच्या मतदानप्रक्रियेमध्ये १७३१ पुरूष आणि १९१५ स्त्रिया अशा एकूण ३६४६ मतदारांचा समावेश होता. यापैकी १ हजार २७२ पुरूष आणि १ हजार ३२० महिलांनी अशा एकूण २ हजार ५९२ मतदारांनी मतदान केल्याने एकूण टक्केवारी ७१.०९ झाली आहे.

प्रभात १ मध्ये ४७१ पैकी ८६ मतदान झाले असून १८.२६ टक्केवारी आहे. प्रभाग ३ .../२

# मतदानाचा टक्का वाढला, आता निकालाची लांब पल्ल्याची उत्कंठा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरपंचायत निवडणूक अनुषंगाने मतदान केंद्रावर दुपारी ०३.३० वा.पर्यंत ६२% मतदान झाले असून सर्व ईव्हीएम मशीन सुरू होत्या. मतदान शांततेत सुरू होते. पोलिस प्रशासनाने अत्यंत चोख बंदोबस्त ठेवला. माणगांवात सकाळी थंडी आणि धुक्यातूनच मतदान केंद्रावर मतदाना साठी रांगा दुपारी वेग मंदावला व पुन्हा रांगा दिसल्या मात्र शांततेत मतदान सुरु होते. प्रभागनिहाय मतदानाची दुपारनंतरची टक्केवारी खालील प्रमाणे

प्रभाग क्र. ०१ मतदान ५० %, प्रभाग क्र. ०२ मतदान ५५ %, प्रभाग क्र. ०३ मतदान ५३%, प्रभाग क्र. ०४ मतदान ७४ %, प्रभाग क्र. ०५ मतदान ७५ %, प्रभाग क्र. ०६ मतदान दि. १८ जाने. होणार, प्रभाग क्र. ०७ मतदान ५८ %, प्रभाग क्र. ०८ मतदान, प्रभाग क्र. ०९ मतदान ६२ %, प्रभाग क्र. १० मतदान ५८%, प्रभाग क्र. ११ मतदान ७१ %, प्रभाग क्र. १२ मतदान ६५ %, प्रभाग क्र. १३ मतदान ५६ %, प्रभाग क्र. १४ मतदान, प्रभाग क्र. १५ मतदान ५३%, प्रभाग क्र. १६ मतदान ७६ %, प्रभाग क्र. १७ मतदान.

मतदानाला मतदारांचा उत्साह पाहता जवळपास सत्तर टक्के मतदानाची अपेक्षा आहे.

कमी अवधीत व प्रचारालाही कमी संधी मिळाली असली तरी एकंदरीत या निवडणुकीत फार चांगले मतदान झाल्याने आता जवळपास एक महिन्याने निकाल लागणार असल्याने सर्व माणगांवकरांना पुढील काही दिवस तरी कोणाच्या पारड्यात किती मतदान झाले असेल याची आकडेमोड अंदाज आडाखे बांधण्यास मोठा अवधी असुन उमेदवारांच्या मनात धाकधुक राहणार हे मात्र निश्चित.

# माथेरानमध्ये निवडणुकीचे पडघम लागले वाजू

**दै.रायगड नगरी । माथेरान**

गाव लहान पण राजकारण महान अशीच काहीशी ख्याती असलेले माथेरान हे अगदी छोटेसे नगरपरिषदेचा दर्जा लाभलेले पर्यटनस्थळ आहे. परंतु गावाला अभिप्रेत असणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी इथली राजकीय मंडळी पायरीपायरीने न जाता थेट देशाच्या राजधानी पर्यंत मजल मारून कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणारी एकमेव राजकीय मंडळी बहुधा याच ठिकाणी पहावयास मिळतात. गल्लीतले राजकारण दिल्ली दरबारी नेण्यात इथल्या मुख्य पक्षांचा हातखंडा आहे. त्यासाठी यावेळेस कोणत्याही परिस्थितीत नगरपरिषदेत सत्ता स्थापन झालीच पाहिजे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून इथले प्रमुख राजकीय पक्ष आतापासूनच कामाला लागले आहेत. जो तो पक्ष आपापल्या परीने नवनवीन संकल्पना राबविण्यात पुढाकार घेताना दिसून येत आहे.काही पक्षांनी अनधिकृत झोपडपट्टी अधिकृत करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे, नवीन एखादी बँक सुरू करून जनतेच्या प्रश्नांची उकल करावी जेणेकरून मतदार आकर्षित होऊ शकतात, कुणी विविध प्रकारच्या शिबिरांचे आयोजन सुरू केले आहे, कुणी जेष्ठांना मदतीचा हातभार लागावा म्हणून मासिक पेन्शन योजना सुरू केली आहे,एखादा जीवनावश्यक प्रश्न हाताशी धरून अन्य पक्षाच्या सहकार्याने उपोषणाचा पवित्रा घेतलाआहे,शक्तिप्रदर्शनासाठी मतदारांना एकत्रित करून मेळावे, वाढदिवस आणि पार्ट्या झोडण्यास सुरुवात केली आहे,त्यातच नववर्षाच्या आरंभीला क्रिकेटचा हंगाम सुरू होणार असल्याने विविध संघांना भरघोस आर्थिक मदत देण्यासाठी काही पक्ष पुढाकार घेण्यास सज्ज झाले आहेत,माथेरान मधील भाडेपट्टा मिळकती कब्जा हक्काने मंजूर कराव्यात यासाठी शासन दरबारी मागणी केली जात आहे, एकूणच आता जवळपास प्रमुख पक्षांच्या माध्यमातून आगामी काळात सत्ता स्थापन करण्यासाठी जोरदार सुरुवात केलेली असून मतदारांना आकर्षित कशाप्रकारे करता येईल यासाठी नवन-वीन युक्त्या आखण्यात येत आहेत.गावाच्या हितावह असलेले प्रश्न हाताळण्यासाठी सर्वांनी झोकुन दिलेले असून पक्षप्रवेश,त्याचप्रमाणे मोठी कुटुंबे निवडणुकीपर्यंत सोबत राहावीत यासाठी कुटुंबातील एखादया सदस्याला पक्षातील पदे सुध्दा बहाल करण्यात येत आहेत.निवडणुकीच्या अंतिम क्षणापर्यंत काही पक्षातील अंतर्गत कुरघोड्या आणि दुखावलेले कार्यकर्ते वेळेनुसार कोणत्याही पक्षाचा झेंडा खांद्यावर घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे हे चित्र सुध्दा यावेळी इथे पहावयास मिळणार आहे. आजवर प्रामाणिकपणे आणि एकाग्रतेने पक्षाशी एकनिष्ठ राहून देखील काही कार्यकर्त्यांना पक्षात गृहीत धरून दुय्यम वागणुक दिली गेल्याने त्यांची नाराजी दूर करण्यासाठी पक्ष प्रमुखांना बारकाईने निरीक्षण करावे लागणार आहे. निवडणुका अजून काही दिवस लांबणीवर गेल्याने या कालावधीत प्रत्येक पक्षाला आपले कार्यकर्ते सांभाळणे हे सुध्दा एकप्रकारे कठीण होणार आहे.निवडणूक पूर्व काळात ऐन थंडीच्या मोसमात सुध्दा इथले राजकीय वातावरण मात्र गरम होताना दिसत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सदनिका ही मालक श्री.इम्रान ए. डब्ल्यू गांधी व सौ. शबाना इम्रान गांधी त्यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताबे कब्जातील मिळकत असून सदरील विद्यमान मालकांनी सदरील सदनिका विकण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच सदर सदनिका ही पूर्णतः निर्वेध व निर्जोखिम असून, त्यांना सदरील सदनिका विकण्याचा, पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी दिला आहे. सबब सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसलाही करार, मदार, गहाण, दान, लिज, लिन, पोटगी इ. अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर कोणत्याही प्रकारचे महसूली अगर दिवाणी दावे प्रलंबित असल्यास, प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांत आमचे खालील पत्यावर मुळ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. उपरोक्त मुदतीत हरकत न आल्यास, सदरील सदनिका ही पूर्णत : निर्वेध, निजोखमी व निष्कर्जी असून विद्यमान मालकांस तिचे पूर्ण मार्केटेबल टायटल आहे, तसेच अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, अधिकार व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही कसलीही हरकत / तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**

**पटेल अपार्टमेंट, सदनिका क्रं.२०२, दुसरा मजला, अे विंग, क्षेत्र ७१० चौ.फूट कारपेट म्हणजेच ६५.९६ चौ.मी. कारपेट एरिया, २ बीएचके विथ अॅटेच टॉयलेट ब्लॉक, स.नं.६१ बी, कोन गांव, ता.पनवेल, जि.रायगड**

येणेप्रमाणे नोटीस दिली.

पनवेल
दि.२१/१२/२०२१

**सही/-**
**श्री.राजीव गुप्ता**
**अॅडव्होकेट व नोटरी**
**शॉप नं.०३, कनक सरोवर, जुना ठाणा नाका रोड, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मोबा नं.७३०३१६१३३७/७६६६३६१३३७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.गोपालन उन्नीकृष्णन व सौ.रुबी उन्नीकृष्णन यांच्याकडून कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**प्लॉट नं.२, रोड नं.८, सेक्टर ११, नवीन पनवेल पूर्व, क्षेत्र-१४५.९११ चौ.मी. व त्यावरील जी+२ बांधकाम ता.पनवेल, जि.रायगड**

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्त, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्कत असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२१/१२/२०२१

**सही/-**
**अॅड.भूषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८९२२२२२५७**

मा.इंदलकर सो. कोर्ट
अॅड.प्रणाली सोहनी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.नं.१३२९/२०२१
नि.नं.७
ने.ता.०७/०२/२०२२

श्री.आकाश भरत पाटील
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.पाटणोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत नानोशी
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा श्री.आकाश भरत पाटील रा.पाटणोली, ता.पनवेल यांचे वडील कै.भरत विठ्ठल पाटील दि.२३/०७/१९९९ रोजी मु.पो.पाटणोली, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत.

सदर अर्जदाराने कै.भरत विठ्ठल पाटील यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.भरत विठ्ठल पाटील वर नमूद ठिकाणी मृत्यू झालेली आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यू नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२१/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

अर्जदारातर्फे वकील
अॅड.सतीश निखार

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८९९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०२/२०२२

१) श्रीमती.शर्मिला बिल्वराज नाबर
रा.फ्लॅट नं.३०१/३०२ सॉनेट, केसर हार्मोनी,
प्लॉट नं.११/१२, सेक्टर ०६, गोल्फ कोर्स जवळ,
खारघर-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी सदर अर्जदार क्र.१ यांची आई श्रीमती.प्रतिभा प्रभाकर पै, यांचे दि.०७/०३/२०१५ रोजी खारघर येथे झाले आहेत.

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील फ्लॅट नं.४०४, ४ था मजला, गॅलेक्सि करिना, प्लॉट नं.१०, सेक्टर १५, खारघर-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र, क्षेत्रफळ- (६०६.४२ चौ.फूट कारपेट + ८२.७५ चौ.फूट एफ बी + ५५.७२५ चौ.फूट डेक + ११.६३ चौ.फूट सर्व्हीस एरिया + १९३.२० चौ.फूट टेरेस) (१/३ भाग)**

सदर सदनिका अर्जदाराचे नावे होण्याकरिता त्यांनी ते मयत श्रीमती.प्रतिभा प्रभाकर पै यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यास त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२१/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.इंदलकर सो. कोर्ट
अॅड.प्रणाली सोहनी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.नं.१३३१/२०२१
नि.नं.७
ने.ता.०७/०२/२०२२

श्री.अभिषेक धनराज पाटील
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.पाटणोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत नानोशी
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा श्री.अभिषेक धनराज पाटील रा.पाटणोली, ता.पनवेल यांची आजी कै.तुळसाबाई गजानन पाटील दि.१०/११/१९८८ रोजी मु.पो. पाटणोली, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत.

सदर अर्जदाराने कै.तुळसाबाई गजानन पाटील यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.तुळसाबाई गजानन पाटील वर नमूद ठिकाणी मृत्यू झालेली आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यू नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२१/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

मा.इंदलकर साहेब यांचे कोर्टात
अर्जदारातर्फे वकील : अॅड.आशिष पनवेलकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१३१७/२०२१
ने.ता.२९/०१/२०२२

सौ.सरला रामचंद्र व्होटकर
वय : ७२, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.७०२, श्री कृष्णा टॉवर, प्लॉट नं.१८,
गोकुळ डेअरीच्या समोर, सेक्टर १९, कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.आयुक्त साहेब
पनवेल शहर महानगरपालिका
निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै.रामचंद्र विठ्ठल व्होटकर यांचे दि.१५/०६/२०२० रोजी राहत्या घरी राहणार फ्लॅट नं.७०२ श्री कृष्णा टॉवर प्लॉट नं.१८, गोकुळ डेअरीच्या समोर सेक्टर १९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता.

अर्जदार यांचे पती कै.रामचंद्र विठ्ठल व्होटकर यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.रामचंद्र विठ्ठल व्होटकर या वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

# दागिने खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून एक इसम पसार झाल्याची घटना सुकापूर परिसरात घडली आहे.

सुकापूर शिवनगर येथे राहणाऱ्या जेनसी पॉलराज या शिवण क्लास आपटनू घरी जात असताना हायवेच्या बाजूच्या कच्च्या रस्त्यावर एका अज्ञात इसमाने त्यांना थांबवून विजय पाटील कुठे राहतो असे विचारुन त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

मा.गोडसे सो
अर्जदाराचे वकील : अॅड.विजया म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय
दि.चौ.अर्ज क्र.१७७८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०१/२०२२

१) कु.ओमकार विष्णू पाटील
वय : २३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
मु.कोपर कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१) श्रीम.गुलाब विष्णू पाटील
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्रीम.दर्शना विष्णू पाटील
वय : २० वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) कु.गणेश विष्णू पाटील
वय : १८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सामनेवाला नं.१ ते ३ सर्व रा.कोपर कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे, वरील अर्जदार नं.१ व सामनेवाला नं.२ ते ३ यांचे वडील तसेच सामनेवाला नं.१ यांचे पती कै.विष्णू पांडुरंग पाटील हे दि.०९/०२/२०१९ रोजी मौजे : मु.कोपर-कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहे. सदर मयत व्यक्तीस खालीलप्रमाणे वारसदार आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : कोपर (कोल्ही), ता.पनवेल, जि.रायगड**
**घर मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | घर क्रमांक | मालकाचे नाव | बांधकामाचा प्रकार व इतर | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| ९३ | ३१८/ब | विष्णू महादेव पाटील | बांधकाम | १६.७६ |

**मौजे : कोपर-कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूधारकाचे / बांधकाम धारकाचे नाव | संयुक्त मोजणीनुसार भूधारकाच्या ताब्यामधील व वहिवाटीतील खालील एकूण क्षेत्र (चौ.मी.) | मोजणी इमारत क्रमांक | सर्वेक्षणा नुसार बांधकाम / इमारत क्रमांक | ग्रामपंचायत घर क्रमांक | बांधकामाचा प्रकार | बांधकामाचा वापर | बांधकामाचे मजले | बांधकामाच्या पायाचे मजल्या सह अनुज्ञेय बांधीव क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाच्या छपरा खाली अनुज्ञेय बांधीव क्षेत्र (चौ.मी.) | देय भूखंडा मधील अविभक्त हिस्सा (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) दत्तात्रय पांडुरंग पाटील | ९५.१९ | १९ | KP-71 | ३१८/क | लोड बेअरिंग इमारत | निवासी | तळ मजला | २९.४७ | २९.४७ | २१२.३३ |
| | | | | | | | पहिला मजला | २९.०० | ३९.११ | |
| २) ओंकार विष्णू पाटील | | | KP-71/A | ३१८/ब | इमारत | | --- | १६.७६ | १८.१० | ६०.८६ |
| ३) महादेव पांडुरंग पाटील | | | KP-71/B | ३१८/अ | इमारत | | --- | १५.८२ | २०.२७ | ५८.४४ |
| ४) शंकर पांडुरंग पाटील | | | KP-71/C | ३१८/क | इमारत | | --- | २७.३६ | ३५.९९ | ९९.३७ |
| | | | | | मोकळे टेरेस | | --- | 0.00 | 0.00 | |

येणेप्रमाणे घर मिळकतीचे वर्णन असून सदरहू घर मिळकत अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.विष्णू पांडुरंग पाटील यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२० माहे १२ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# तळा नगरपंचायतीच्या दिग्गज उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद ; ७३.८२% मतदान

अपक्ष ५ पैकी १ बिनविरोध विजयी असे एकूण ३६ उमेदवार उभे असून खरी लढत ही शिवसेना × राष्ट्रवादी × भाजप यांच्यात होणार आहे. उमेदवार आपले नशीब आजमावणार असून या सर्व ३५ उमेदवारांचे भवितव्य आज बंद पेटीत बंद झाले असून ७३.८२% मतदान झाले आहे. यंदा टक्केवारी वाढली आहे. दरम्यान उप विभागीय पोलीस अधिकारी महाड तांबे तळा पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांनी प्रत्येक केंद्रावर भेटी देऊन सुरक्षा व्यवस्थेची पहाणी केलीया काळात कोणताही अनुचित प्रकार घडला असून पोलीस यंत्रणा, राखीव पोलीस, होमगार्ड तैनात ठेवण्यात आले होते. मतदान शांतता सुव्यवस्थेत सुरळीतपणे पार पडले असून निकालाची वाट पहावी लागणार आहे.

# स्वामी नित्यानंद मार्ग रस्त्याच्या काँक्रीट रोड होण्यास महानगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता

करण्याबाबत सूचित केले होते. सदर प्रस्तावित कामांमध्ये फ्लेक्सिबल पेमेंट पावसाळी गटारात पाच स्वीट लाईट शिल्लक असलेले काँक्रीट पेमेंट मधील खोदकाम करण्यासाठी दोन्ही बाजूस पाण्याच्या लाईन टाकणे, विद्युत व दूरसंचार केबल टाकणे याकरिता ह्युम पाईप टाकणे, कामास अडथळा येणाऱ्या कुंपण भिंत तोडून नवीन बांधणे इत्यादी कामांचा समावेश असलेल्या ९,९८,८८,४०५/- रुपयाच्या अंदाजपत्रकाला दि.२०/१२/२०२१ रोजीच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली आहे. सभागृहात बोलताना विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी ज्या सोसायटीचे भूसंपादन करण्यात येणार आहे त्यांना योग्य तो कंपेसेशन द्यावे ही मागणी केली आहे. तसेच ज्या सोसायट्यांचे जमिनी या कामात जाणार आहेत अशा सोसायटीच्या नागरिकांचे विविध मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सभागृह पुढे मांडली.

# पनवेलमध्ये नियम मोडणाऱ्या २६५ रिक्षांवर कारवाईचा बडगा

नियमांचे पालन केले जात नसल्याने २६५ रिक्षाचालकांना वाहतूक विभागाच्या कारवाईस सामोरे जावे लागले.

काही दिवसांपूर्वी पनवेल परिसरातील रिक्षा संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड व वाहतूक शाखेच्यावतीने घेण्यात आली होती. यावेळी सर्व रिक्षा चालकांना आरटीओ दंडात भरमसाठ वाढ झाल्याची माहिती देऊन प्रवाशांशी सौजन्याने वागा, मीटरप्रमाणे भाडे घ्या, रिक्षा पासिंग, इन्शुरन्स, पीयूसी, गणवेश, लायसन्स यासह बॅच नेहमी सहज दिसेल असे लावावे आणि सर्व रिक्षा चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे अशा विविध सूचना देण्यात आल्या होत्या. तरीदेखील काही रिक्षाचालक अजूनही नियमांचे उल्लंघन करत असल्याचे वाहतूक विभागाच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने एकूण २६५ रिक्षांना वाहतूक विभागाच्या कारवायांना सामोरे जावे लागले.

# पोलादपूर नगरपंचायतीच्या १३ प्रभागांच्या निवडणुकीसाठी ७१.०९ टक्के मतदान

मध्ये २२७ मतदारांपैकी १८५ मतदारांनी मतदान केल्याने ८१.५० टक्के मतदान झाले. प्रभाग ४ मध्ये ४५२ मतदारांपैकी ३२३ जणांनी मतदान केले असून ७१.४६ टक्के मतदान झाले झाले आहे. प्रभाग ५ मध्ये २९२ मतदारांपैकी १९७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने ही टक्केवारी ६७.४७ झाली आहे. प्रभाग ६मध्ये एकूण मतदार २४५ असून १८७ मतदान झाल्याने ७६.३३ टक्के मतदान झाले आहे. प्रभाग ७ मध्ये ३५४ एकूण मतदार असून त्यापैकी २८५ मतदारांनी हक्क बजावल्याने ८०.५१ टक्के मतदान झाले आहे. प्रभाग ९ मध्ये २४१ मतदारसंख्या असून १८६ मतदारांनी मतदान केल्याने ७७.१८ टक्के मतदान झाले. प्रभाग ११ मध्ये एकूण मतदान २९४ असून २४३ मतदान झाले असून ८२.६५ टक्के मतदान झाल्याची नोंद झाली आहे.

प्रभाग १२ मध्ये १८८ मतदारांपैकी १५० मतदारांनी हक्क बजाविला. ही टक्केवारी ७९.७९ मध्ये झाली आहे. प्रभाग १३ मध्ये २४६ मतदानापैकी २०७ मतदान होऊन ७४.१५ टक्के नोंद झाली आहे. प्रभाग १५ मध्ये एकूण मतदान २८९ असून २३९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला ही टक्केवारी ८२.७० आहे. प्रभाग १६ मध्ये एकूण मतदार १२३ असून त्यापैकी १०७ मतदान झाले असून ८६.९९ टक्केवारी झाली आहे. प्रभाग १७ मध्ये एकूण मतदार २२४ असून १९७ मतदारांनी हक्क बजाविला असून मतदानाची टक्केवारी ८७.९५ झाली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## चाणजे ग्रुपग्रामपंचायत वॉर्ड क्रमांक सहा मध्ये विविध कामांचे भूमिपूजन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चाणजे ग्रुपग्रामपंचायत अंतर्गत वॉर्ड क्रमांक सहा मध्ये ग्रामपंचायत सदस्य अमित भगत, व्यंकटेश म्हात्रे व सुप्रिया कोळी यांनी निवडणुकीत दिलेल्या वचनानुसार कोंढरीपाड्यातील हनुमान नगर (काश्मीर गल्ली ) या ठिकाणी नवीन सिंमेट कॉक्रींट रस्त्याचे उदघाटन तसेच बाबदेवपाड्यातील श्री बाबदेव मंदिराच्या पाराच्या सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ दिनांक २१ डिसेंबर रोजी पार पडला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य अमित भगत, व्यंकटेश म्हात्रे, सुप्रिया कोळी तसेच गावातील जेष्ठ नागरिक कृष्णा थळी, भाऊकाका म्हात्रे, अरूण ठाकूर, तेजेश पाटील, सचिन भोईर, नित्या पाटील, कुमार भोईर तसेच महिला विजया म्हात्रे, पुष्पा भोईर, वृषाली ठाकूर इत्यादी महिला वर्ग व ग्रामस्थ हजर होते. तसेच निवडणूकीत अमित भगत, व्यंकटेश म्हात्रे, सुप्रिया कोळी दिलेल्या वचनाची पूर्तता केल्याबद्दल तसेच रस्ता बांधण्यासाठी विशेष सहकार्य करणारे किशोर डाऊर यांचे नागरिकांनी आभार व्यक्त केले आहे.

# विविध मागण्यासाठी शिक्षक व पालकांचे बेमुदत धरणे आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

आर के एफ या संस्थेने मुख्याध्यापक रमाकांत गावंड यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबतचे नियमबाह्य पत्र देऊन शासकीय नियमांचा भंग केल्यामुळे त्याचा निषेध करण्यासाठी तसेच सदर नोटीस त्वरित मागे घ्यावी आणि शासन निर्णया प्रमाणे बंधनकारक असणाऱ्या इतर मागण्या मान्य करण्यासाठी शाळेच्या गेटवर कोविड १९ च्या नियमांचे पालन करून सर्व पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी संविधानिक मार्गाचे अवलंब करून बेमुदत धरणे आंदोलनाला सुरवात केली असून दि २१/१२/२०२१रोजी बेमुदत धरणे आंदोलनाचा दुसरा दिवस आहे.

जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयाची स्थापना सण १९८९ साली झाली असून त्याचे व्यवस्थापन इंडियन एज्युकेशन सोसायटी मुंबई यांच्या मार्फत गेली ३० वर्षे होत होते.१ जुलै २०१९ पासून जे एन पी टी मॅनेजमेंटने हे विद्यालय चाळविण्यासाठी रुस्तोमजी केरावाला फॉउंडेशन, मालाड मुंबई या संस्थेस दिलेले आहे. तेव्हापासून आजतागायत हि संस्था अनधिकृतपणे शाळा चालवत आहे. या संस्थेस हि शाळा चाळविण्यासाठी शासनाची कोणत्याही प्रकारची मान्यता नाही. या संस्थेने महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १७/२/२०१२ नुसार हस्तांतरण केलेले नाही त्यामुळे हि शाळा



चालवीण्याचा त्यांना कोणताही अधिकार नसताना दिनांक १८/१२/२०२१ रोजी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रमाकांत गावंड यांना कोणतेही सबळ कारण नसताना सक्तीच्या रजेवर पाठविले आहे. तसेच विनाकारण ६ शिक्षकांना देखील निलंबित करण्यात आले आहे.त्यांना अडीच वर्षाचा पगार देखील देण्यात आलेले नाही. एकूण ११४ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अशी बेकायदेशीर अनधिकृत कारवाईची टांगती तलवार आहे.या घटनेमुळे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी पालक वर्गात असंतोष निर्माण झाला आहे. या कृत्याचा निषेध करण्यासाठी व विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक वर्ग दिनांक २०/१२/२०२१ पासून शाळेच्या गेट समोरच बेमुदत आंदोलनाला बसले आहेत.कोकण विभाग अध्यक्ष नरसु पाटील, शिक्षक सेना महाराष्ट्र राज्याचे, जिल्ह्याचे पदाधिकारी, न्हावा शेवा अंतर्गत बंदर कामगार संघटना, उरण सामाजिक संस्था, छावा संघटना उरण, उरण एकजूट संघटना, माजी विद्यार्थी संघटना तसेच सर्व राजकीय पक्षांनी या आंदोलनाला जाहिर पाठिंबा दिला आहे.सदर समस्यांचे निवेदन पत्रव्यवहाराद्वारे शालेय शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदितीताई तटकरे, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, अतिरिक्त मुख्य सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग –वंदना कृष्णा मॅडम, चेअरमन– जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट,आमदार बाळाराम पाटील, आर के एफ संस्थेचे उपाध्यक्ष कविता केरावाला, शिक्षणाधिकारी रायगड जिल्हा, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती उरण,नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, न्हावा शेवा पोलीस स्टेशन आदी शासकीय विभागांना देण्यात आले आहे.सदर धरणे आंदोलन पालक शिक्षक संघर्ष समितीचे अध्यक्ष विकास कडू, पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत, मुख्याध्यापक रमाकांत गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# माथेरानमध्ये राष्ट्रवादीचा कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

काल माथेरानमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा कार्यकर्ता संवाद मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला ह्यावेळी कर्जत तालुक्यातील अनेक राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

माथेरान नगरपालिकेची निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली असताना ह्या मेळावा बाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता होती माथेरान नगरपालिकेतील सर्वात मोठा व अधिक काळ सत्तेत राहिलेला पक्ष म्हणून राष्ट्रवादीकडे पाहिले जाते मागील निवडणूकिमध्ये राष्ट्रवादीचे अनेक उमेदवार थोड्या फरकाने पराभूत झाले होते पक्षांतर्गत नाराजी त्यावेळी दिसून आली होती तर विरोधी शिवसेनेने राष्ट्रवादीच्या अनेक कार्यकर्त्यांना फोडल्याने राष्ट्रवादी चा निवडणुकीमध्ये पराभव झाला होता. पण मागील पाच वर्षात पक्षाला सोडून गेलेलं अनेक कार्यकर्ते पुन्हा एकदा पक्षात आल्याने ह्या मेळाव्यास एक वेगळे महत्व प्राप्त झाले होते त्यातच राष्ट्रवादी मध्ये मागील काही दिवसांमध्ये नेतृत्व बदल झाल्याने अजय सावंत यांनी पक्षाने बढती देऊन जिल्हा सरचिटणीस पदी वर्णी लावली होती तर तरुण रक्ताला वाव देताना राजेश दळवी यांची शहराध्यक्ष तर सौ स्वाती कुमार यांनी महिलाध्यक्षा पदी निवड केल्यानंतर पक्षात अनेक बदल घडत असून ह्यावेळी महिला कार्यकर्त्यांची पदाधिकाऱ्यांनाची निवड ही जाहीर करण्यात आली तर सागर जोशी यांची राष्ट्रवादी शहर युवक च्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

ह्यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कर्जत तालुका भगवान चंचे, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, जिल्हा सरचिटणीस अजय सावंत,कर्जतचे माजी नगराध्यक्ष राजेश लाड,कर्जत गटनेते शरद लाड, राष्ट्रवादी युवक जिल्हा उपाध्यक्ष नोमान नजे,कर्जत तालुका युवक अध्यक्ष सागर शेळके, महिला अध्यक्ष रंजनाताई धुळे मनीषा पाटील व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेलच्या स्वच्छता मोहिमेत महापालिका आणि संस्थांचा सहभाग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत पनवेल महानगरपालिका व काही संस्थांच्या सहाय्याने वडाळे तलावासमोरील बगीच्यामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, नंदनवन कॉम्प्लेक्स, जनहित संघटना या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी झाल्या होत्या. या स्वच्छता मोहीम अभियानादरम्यान वडाळे तलावासमोरील परिसरात झाडे लावून सुशोभीकरण करण्यात आले.

उपस्थित असलेल्या नागरिकांमध्ये स्वच्छता विषयक जनजागृती विषयी चर्चा करण्यात आली.

यावेळी उपस्थित नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेदरम्यान नगरसेविका दर्शना भोईर, महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अरुण गजरे, नंदनवन कॉम्प्लेक्सचे लिमये, जनहित संघटनेचे यशवंत दातार, समाजसेवक विलास पाटील आदी उपस्थित होते.

---

मा.गोडसे सो

ॲड.सुजाता पाटील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८९३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०१/२०२२

१) सईदा मोहिद्दीन सांगे उर्फ सनगे
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
२) हसीबा मोहिद्दीन सनगे
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
३) हादी मोहिद्दीन सनगे
वय : २३ वर्षे, धंदा : नोकरी
४) मुहम्मद मोहिद्दीन सनगे
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.बी.२०५, अलंकार गंगा कॉम्प्लेक्स,
ओप्प पूजा नगर, मिरा रोड ईस्ट,
मिरा भायंदर, ठाणे, महाराष्ट्र ४०११०७ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ ते ४ यांचे वडील कै.श्री.मोहिद्दीन ईबन समसुद्दीन सनगे यांचे दि.१४/०१/२०२१ रोजी कुवेत येथे निधन झाले आहे. कै.श्री.मोहिद्दीन ईबन समसुद्दीन सनगे यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**अ) मालमत्ता परिशिष्ट (अचल मालमत्ता)**
**सदनिका क्रं.५०१, माळा नं.पाचवा मजला, माहीर हाईटस्, प्लॉट नं.९३, सेक्टर १०, तळोजा, तालुका पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१० एकूण क्षेत्रफळ ७५६ चौ.फूट बांधीव एफ बी व सर्व्हीस एरिया सह**
**ब) मालमत्ता परिशिष्ट**
**सदनिका नं.५०४, पाचवा मजला ३/१५/१६, एलिगंट हाईटस, प्लॉट नं.०७, सेक्टर १६, कळंबोली, नवी मुंबई तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**एकूण क्षेत्रफळ : ६८१ चौ.फूट कारपेट**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो

ॲड.अर्चना वाकुडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) मा.गोडसे साहेब यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८९७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२७/०१/२०२२

१) श्री.दिपक अशोक सोनावणे
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) कुमार.अनशिल दिपक सोनावणे
वय : ४ वर्षे, अज्ञान
(नैसर्गिक पालनकर्ता त्याचे वडील म्हणजेच अर्जदार नं.१)
३) कुमारी.समिक्षा दिपक सोनावणे
वय : १ वर्षे, अज्ञान
(नैसर्गिक पालनकर्ता त्याचे वडील म्हणजेच अर्जदार नं.१)
सर्व रा.बी.४२२, डॉ.आंबेडकर नगर,
एस.आर.ए.सीएचएस, सम्राट अशोक
बुद्धविहाराजवळ, घाटकोपर वेस्ट, ग्रेटर, मुंबई–४०००८६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार नं.१ हे पती, अर्जदार नं.२ मुलगा व अर्जदार नं.३ मुलगी कै.सुषमा दिपक सोनावणे मयत रा.बी–४२२, डॉ.आंबेडकर नगर, एस.आर.ए सीएचएस, सम्राट अशोक बुद्धविहाराजवळ, घाटकोपर वेस्ट, ग्रेटर मुंबई–४०००८६ यांचे दि.२८/०९/२०२० रोजी घाटकोपर, मुंबई येथे निधन झाले. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**१) फ्लॅट नं.०७०६, बिल्डींग नं.एल ०८, प्लॉट नं.१, सातवा मजला, सेक्टर ३७, नोड तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्रफळ २९.८२ चौरस मीटर** (Carpet area)

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावे.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारसदार म्हणून जाहीर करील व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
अवंतिका भ. देशकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५१०/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१४/०१/२०२२

श्रीमती.पुष्पलता सुनील कांबळे व इतर ३
वय : ४६ वर्षे, धंदा : घरकाम
सर्व रा.फ्लॅट नं.१०४, सोमाशिस पार्क, प्लॉट नं.४०,
पुरोहित हॉस्पिटल जवळ, एम.सी.सी.एच.सोसायटी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. सुनील तानाजी कांबळे हे दि.३०/११/२०१९ रोजी मु.१०४, सोमशिस पार्क, प्लॉट नं.४०, पुरोहित हॉस्पिटलजवळ, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले आहेत. मयत कै.सुनील तानाजी कांबळे यांचे मृत्यूसमयी ता.पनवेल येथे खालील वर्णनाच्या सदनिका / फ्लॅटस आहेत.

मयत कै.सुनील तानाजी कांबळे यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे असलेल्या खालील वर्णनाच्या सदनिका / फ्लॅट आहेत.

**सदनिका क्र.१ (फ्लॅटचे वर्णन)**
**रुम नं.०१, ग्राऊंड फ्लोअर, डिलक्स बिल्डींग, बिल्डींग नं.१, सेक्टर १, महालक्ष्मी नगर, नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्र.२ (फ्लॅटचे वर्णन)**
**फ्लॅट नं.१०४, सोमाशिस पार्क, प्लॉट नं.४०, पुरोहित हॉस्पिटलजवळ, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदार क्र.१ ते ४ हे वरील मिळकतीसंदर्भात मयतांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जदार क्र.१ ते ४ हे एकमेव वारस असल्यामुळे या वारस हक्कासंबंधी कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतःच्या अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलामार्फत हजर राहून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्या मे.कोर्ट अर्जदारांच्या लाभांत पुरावा घेण्याची कारवाई करेल व अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत कै.सुनील तानाजी कांबळे यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.१४/१२/२०२१ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

ॲड.अश्विनी तोरमले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८८७/२०२१
नि.नं.१२/ड
ने.ता.०९/०२/२०२२

१) विजया मधुकर कोकणे
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : दि स्प्रिंग्स को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड,
सेक्टर २०, प्लॉट नं.०४, फ्लॅट नं.फ–१६०१,
रोडपाली, कळंबोली, नवी मुंबई–४१०२१८ — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.नवनाथ मधुकर कोकणे
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : धंदा
पत्ता : दि स्प्रिंग्स को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड,
सेक्टर २०, प्लॉट नं.०४, फ्लॅट नं.फ–१६०१,
रोडपाली, कळंबोली, नवी मुंबई–४१०२१८ — सामनेवाला

अर्जदार क्र.१ यांचे पती कै.मधुकर शंकर कोकणे दि.१५/०४/२०२१ रोजी कामोठे, नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. सदरहू मयत कै.मधुकर शंकर कोकणे यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**१) गाळा नं.१६६, ब्लॉक–फ, ए.पी.एम.सी.फ्रुट मार्केट, सेक्टर १९, तुर्भे, नवी मुंबई–४००७०५, क्षेत्र ४५० चौ.फूट, समावेश तळमजला ३०० चौ.फूट, आणि पहिला मजला १५० चौ.फूट**
**२) फ्लॅट नं.फ–२०१, आकाशदिप, पटेल हेरिटेज को–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, सेक्टर ०७, प्लॉट नं.१५ आणि १७, खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**क्षेत्र ७८५ चौ.फूट, बिल्टअप आणि ७३२ चौ.फूट टेरेस**
**३) फ्लॅट नं.२०४, दुसरा माळा, शिवपार्वती को–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड सेक्टर ०२, प्लॉट नं.०९, सानपाडा, नवी मुंबई**
**क्षेत्र ५७१ चौ.फूट बिल्टअप (८६० चौ.फूट)**
**४) शॉप नं.७, तळमजला, यशश्री प्लाझा को.ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड सेक्टर ०८, प्लॉट नं.११, सानपाडा, नवी मुंबई**
**क्षेत्र ३१.०८ चौ.फूट बिल्टअप**
**५) ५०% हिस्सा फ्लॅट नं.फ–१६०१ दी स्प्रिंग्स को–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, सेक्टर २०, प्लॉट नं.०४, रोडपाली, कळंबोली, नवी मुंबई–४१०२१८**
**क्षेत्र ९९१ चौ.फूट आणि २६४ चौ.फूट टेरेस**
**६) ५०% हिस्सा शॉप नं.२०६, भूमी मॉल प्रेमिसेस सोसायटी लिमिटेड प्लॉट नं.०९, सेक्टर–१५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई–४००४१६**
**क्षेत्र २४.७४४ चौ.फूट बिल्टअप**
**७) फ्लॅट नं.३०८, बी विंग, श्री शांतीनिकेतन (बी) सीएचएसएल, प्लॉट नं.२९ ते ३२,३६,३७, सेक्टर–३० ए, वाशी, नवी मुंबई–४००७०५**
**क्षेत्र ५७६.६४ चौ.फूट बिल्टअप**

वरील मिळकतीबाबत अर्जदार ह्यांनी प्रोबेट दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील प्रोबेटचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशा कोणत्याही प्रकारची तक्रार, वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत मुदतीत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे प्रोबेटचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाहीत. ही नोटीस आज दि.२० माहे डिसेंबर २०२१ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

ॲड.भुषण म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८५७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०१/२०२२

कै.दिलदार चांगा पाटील मयतचे वारस
१) श्रीमती.लता दिलदार पाटील
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.कोल्ही कोपर, घर नं.४४१, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.वर्षा संतोष पवार
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.वयाळ चौक, ता.खालापूर, जि.रायगड
३) सौ.पुनम संतोष पाटील
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.००३/कृपा अपार्टमेंट, गावदेवी रोड,
गावदेवी मंदिराच्या जवळ, कळवा वेस्ट, ठाणे,
कळवा, महाराष्ट्र, ४००६०५
४) सौ.किरण गणेश म्हस्कर
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.तुरमाळे, पो.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.काजल किरण म्हात्रे
वय : २४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.विचुंबे, पो.ओएनजीसी, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.करीना कुणाल पाटील
वय : २१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.कोपर कोल्ही, घर नं.४२१, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.माई चांगा पाटील
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.कोपर कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. दिलदार चांगा पाटील ह्यांचे निधन दि.२७/१०/२००३ रोजी रा.मु.कोपर कोल्ही, घर नं.४४१, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. श्रीमती. लता दिलदार पाटील, वगैरे ह्यांनी कै.दिलदार चांगा पाटील यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोपर, ता.पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| कोपर | ५४ क | ८४ | ४ | ०–५१–५ | १.४२ |
| कोपर | ५६ | ८८ | ५ | ०–७०–६ | ७.६६ |

वरील सामाईक संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.दिलदार चांगा पाटील यांना सिडकोकडून मौजे : वडघर / करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे १०५० चौ.मी.चा भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्रीमती.लता दिलदार पाटील, वगैरे व सामनेवाला हे कै.दिलदार चांगा पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.लता दिलदार पाटील, वगैरे व सामनेवाला यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.दिलदार चांगा पाटील यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो.

ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४३६/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२१/०१/२०२२

१) श्रीमती.अनुबाई गनू भोईर
वय : ८८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.कल्पना गोवर्धन भोईर
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.१ व २ रा.मु.टेंभोडे,
पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.साधना आकाश मोकल
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.३ रा.कुंभार आळी,
पेण, ता.पेण, जि.रायगड
४) श्री.अलंकार गोवर्धन भोईर
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
५) श्री.उत्तम गोवर्धन भोईर
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्र.४ व ५ रा.मु.टेंभोडे,
पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ हे कै.गोवर्धन गणू भोईर यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार नं.१ ह्यांचा मुलगा व अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार नं.३ ते ५ यांचे वडील कै.गोवर्धन गणू भोईर हे दि.३०/०६/२०२१ रोजी मौजे : लाईफ इरा हॉस्पिटल कामोठे येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार नं.१ ते ५ हेच कै.गोवर्धन गणू भोईर यांचे वारसदार आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ५ यांच्याशिवाय कै.गोवर्धन गणू भोईर यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की, कै.गोवर्धन गणू भोईर यांचे स्वकष्टार्जित व सामाईक मालकीची तसेच ताबेकब्जातील तसेच सामाईक नावे असलेल्या मौजे : आसुडगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाच्या निवासी सदनिका मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | मौजे | सोसायटीचे नाव | मजला | सदनिका क्र. | सेक्टर | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड | शिवम बाईट | पहिला | १०१ | ४ | ६२ बी | २८.५८० |
| २ | आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड | शिवम बाईट | पहिला | १०२ | ४ | ६२ बी | २०.७०७ |
| ३ | आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड | शिवम बाईट | दुसरा | २०३ | ४ | ६२ बी | १९.२९ |
| ४ | आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड | शिवम बाईट | चौथा | ४०३ | ४ | ६२ बी | १९.२९ |
| ५ | आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड | शिवम बाईट | चौथा | ४०४ | ४ | ६२ बी | २८.४४ |
| ६ | आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड | शिवम बाईट | चौथा | ४०५ | ४ | ६२ बी | २७.३१५ |

कै.गोवर्धन गणू भोईर यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.गोवर्धन गणू भोईर यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २१/१२/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## नांदगाव येथे आरोग्य व रक्त तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील नवजीवन मच्छिमार संघटना, प्राथमिक आरोग्य पथक, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग व ग्रामीण रुग्णालय मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव-कोळीवाडा येथे आरोग्य व रक्त तपासणी शिबिर ठेवण्यात आले होते.

या रक्त तपासणी शिबिराला नवजीवन मच्छिमार संघटना अध्यक्ष लहू रावजी, प्राथमिक आरोग्य पथकाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नजीर कबले,जिल्हा क्षयरोग केंद्राचे पर्यवेक्षक संकेत घरत, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विशाल माळी, ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक सचिन जाधव, प्रयोगशाळा तंत्रज्ञ समीर धांडोरे, महालॅबच्या स्नेहल विरकुड, प्राथमिक आरोग्य पथकाचे सुभाष हुरदुके आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक सचिन जाधव यांनी एच आय व्ही एड्स या आजाराबद्दल लोकांना सखोल मार्गदर्शन केले.तसेच संकेत घरत यांनी क्षय (टी.बी.) या आजाराविषयी लोकांना अत्यंत उपयुक्त असे मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना सचिन जाधव यांनी एड्स म्हणजे काय, एचआयव्ही म्हणजे काय, त्याची लक्षणे,कारणे, तसेच विविध उपाय योजना, औषध उपचार व घ्यावयाची काळजी या विषयी उपस्थितांना माहितीपूर्ण मार्गदर्शन करून हा आजार असुरक्षित शारीरिक संबंध,दूषित रक्त किंवा रक्त घटक,बाधित मातेपासून त्याच्या होणाऱ्या बाळाला, तसेच दूषित किंवा बाधित सुई किंवा इंजेक्शन यांचा वापर केल्यामुळे एच आय व्ही ची बाधा होते. तसेच भूक मंदावणे,वजन कमी होणे,अंगावर पुरळ किंवा नागिन येणे,रोज संध्याकाळी बारीक हलकासा ताप येणे,अशी लक्षणे या आजाराचे असून,लोकांनी हे सर्व ओळखून लवकरात लवकर तपासणी करून घेणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले.एचआयव्ही बाधित व्यक्ती जर आपल्यास आढळून आला तर त्याला सन्मानाची वागणूक द्यावी,त्याच्याशी भेदभाव करू नये,त्याला समाजात सन्मानाने जगण्यासाठी मदत करावी,असे सांगितले. हा आजार होऊ नये म्हणून असुरक्षित शारीरिक संबंध टाळावे,कंडोमचा वापर करावा,नेहमी रक्त व रक्तघटक चढवताना तपासून घेतले रक्तच घेण्यात यावे, सोबत राहिल्याने, एकमेकांचे कपडे अंथरूण-पांघरूण वापरल्याने, एकमेकांची भांडी वापरल्याने, एकच संडास वापरल्याने हा रोग होत नाही असे सांगितले. तसेच टी बी पर्यवेक्षक संकेत घरत यांनी टी बी आजाराविषयी माहिती देताना त्याची लक्षणे कारणे औषध उपचार याबद्दल माहिती देऊन जास्तीत जास्त लोकांनी थुंकी नमुना देऊन आपली थुंकी तपासणी करून घ्यावी, व या आजाराला निर्बंध घालण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे सांगितले. तसेच याप्रसंगी एकूण ४० लोकांचे थुंकी नमुने तपासणीसाठी घेण्यात आले.

# पाली नगरपंचायत निवडणूक ; ४७ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत कैद

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील प्रख्यात धार्मिक अष्टविनायकाचे क्षेत्र म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या पाली नगरपंचायतीच्या पहिल्याच निवडणुकीची मतदानप्रक्रिया दि.(२१) मंगळवारी शांततेत पार पडली. या निवडणुकीत एकूण ४७ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत कैद झाले असून जनता जनार्दनाचा कौल कुणाच्या बाजूने असेल हे १९ जानेवारीला होणाऱ्या निकालावर स्पष्ट होणार आहे. सायंकाळी उशिरा हाती आलेल्या माहितीनुसार ८५ टक्के मतदान पार पडले. यावेळी मतदारांचा उत्साह दांडगा असल्याचे पहावयास मिळाले.



राजकीयदृष्ट्या अस्तित्वाची लढाई असलेल्या पाली नगरपंचायत निवडणुकीत कोण बाजी मारणार? हे निकालांतीच स्पष्ट होईल, उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत कैद झाले असून मतदाररुपी बल्लाळेश्वर कुणाला पावणार याबाबत आता साऱ्यांनाच उत्सुकता लागून राहिलेली आहे . अटीतटीच्या व चुरशीच्या या लढतीत पालीचा पहिला नगराध्यक्ष होण्याचा मान कुणाला मिळणार याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. पाली नगरपंचायतिच्या एकूण १७ प्रभागांपैकी १३ प्रभागांची निवडणूक प्रक्रिया पार पडली , तर ४ ओबीसी प्रभागाची निवडणूक आता १८ जानेवारीला होणार आहे. पहिल्याच निवडणुकीत शेकाप आणि राष्ट्रवादी आघाडी करुन निवडणुकीस सामोरे गेलेले आहेत. शेकाप ६ तर राष्ट्रवादीचे ७ उमेदवार रिंगणात आहेत. शिवसेना , भाजप व आरपीआय हे स्वतंत्रपणे निवडणुकीत उभे आहेत. या निवडणुकीत शिव-सेनेचे ११ उमेदवार, भाजपाचे १३ उमेदवार, तर रिपाइं पक्षाचा एक उमेदवार निवडणूक रिंगणात उतरून नशीब आजमावत आहेत.

पालीत १७ प्रभागात एकूण मतदार संख्या ८५०० आहे. . या निवडणुकीत १८ वर्ष पूर्ण झालेल्या व प्रथमच मतदानाचा अधिकार बजावणाऱ्या युवक युवतींचा उत्साह दांडगा असल्याचे दिसून आले. दुपारी २ वाजेपर्यंत पालीत ५५ टक्के मतदान झाल्याची माहिती उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी दिली.

नगरपंचायतीमुळे पालीच्या विकासाला आता खऱ्या अर्थाने चालना मिळणार आहे . त्यामुळे मतदार कुणाच्या बाजुने झुकतो हे निकालांती स्पष्ट होणार आहे . पाली नगरपंचायत निवडणुकीत अनेक सुसंस्कृत, उच्चशिक्षित युवा व ज्येष्ठ चेहरे उतरल्याने १९ जानेवारीला लागणाऱ्या निकालावर त्यांचा निभाव कितपत लागतो हे चित्र स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीत उमेदवारांचा चांगलाच कस लागत असून मतदारराजाला देखील डोळसपणे आपला मताधिकार बजावावा लागला आहे, कारण पालीचा सर्वांगीण विकास करून स्वच्छ, सुंदर व समस्या मुक्त पाली व्हायची असेल तर सुसंस्कृत, विकासदृष्टी, असलेले लोकाभिमुख चेहरेच सत्तास्थानी असणे उज्वल भवितव्यासाठी निवडून देणे जबाबदारीचे राहणार आहे.पाली नगरपंचायत निवडणुकीची परीक्षा संपली असून आता साऱ्यांनाच निकालाची प्रतीक्षा लागली आहे, अशातच जो जिता वही सिकंदर म्हणत जनतेला विजयी उमेदवारांचे अभिनंदन करावे लागणार आहे, तर निवडून आलेल्या उमेदवारांना निवडणूक प्रचारादरम्यान दिलेली आश्वासनांची पूर्तता करण्यावर भर देण्याची मोठी जबाबदारी देखील पडणार आहे. यावेळी मतदान केंद्रावर नीटनेटके नियोजन करण्यात आले होते, तर दिव्यांग बांधव, वृद्ध यांच्या सोयीसाठी व्हील चेअर ची व्यवस्था ठेवण्यात आली होती. रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी मतदान केंद्रावर भेट दिली, व मतदानकेंद्रावरील व्यवस्थेची पाहणी केली.

दरम्यान मतदान प्रक्रियेला गालबोट लागू नये, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपविभागीय अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, तसेच पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# निसर्गरम्य डोंगरांना आगी लावण्याचे धडस्त्र सुरूच

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील पूर्व भागातील निसर्गरम्य डोंगरांना आगी लावण्याचे प्रकार समाजकंटकांकडून सुरच आहेत. काल विंधणे - चिरनेर रस्त्यालगत डोंगराला लागलेली आग तीन तासांनी वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या सदस्यांना यश आले आहे. मात्र यामध्ये हिरवीगार निसर्गसंपदा नष्ट होत असल्याने हे वणवे लावणाऱ्यांचा वनखात्याने बंदोबस्त करावा अशी मागणी निसर्ग प्रेमींकडून होत आहे.



एकीकडे महाराष्ट्र शासन करोडो रुपये वृक्षलागवडीसाठी खर्च करीत आहे. अनेक संस्थासुद्धा वृक्ष लागवड करीत आहेत. त्यामुळे डोंगर पठारांवर वृक्षांची हिरवळ वाढली आहे. पर्यायाने या वनराईमध्ये अनेक वन्य पशु पक्षांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सध्या थंडीचा हंगाम सुरू असल्याने विविध प्रजातींच्या विणीचा हंगाम सुरू आहे.

पक्षांच्या घरट्यात उबवणुकीची अंडी असतानाच काही समाजकंटक मुद्दामहून या हिरव्यागार वनराईला वणवे लावुन नष्ट करीत आहेत.

त्यामध्ये विविध प्राणी पक्षी जळून नष्ट होत आहेत. प्राणी, पक्षांबरोबरच विविध जातीच्या औषधी वनस्पतींची सुद्धा या आगीच्या वनव्यांमध्ये राख होत असल्याने निसर्गप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

दरवर्षी वणवे लागून हिरवीगार वनसंपदा नष्ट होऊ लागल्यास शासनाने करोडो झाडे लावूनही महाराष्ट्रातील डोंगर भकास होतील अशी भिती वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी व्यक्त केली आहे.

# फुंडे हायस्कूलमध्ये संत गाडगेबाबा पुण्यतिथी व राष्ट्रीय गणितोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेचे, तु.ह.वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे समाजाला स्वछतेची शिकवण देणारे संत शिरोमणी गाडगेमहाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. तसेच राष्ट्रीय गणितोत्सव ही अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.


विद्यालयाचे चेअरमन कृष्णा कडू, प्राचार्य एम.एच.पाटील, पर्यवेक्षक जी.सी.गोडगे, एस.जी.म्हात्रे, सांस्कृतिक विभागप्रमुख एच.एन.पाटील, दर्शना माळी, व्ही.डी.पाटील यांच्या शुभहस्ते गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर विद्यालयात राष्ट्रीय गणितोत्सव ही अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. गणित विषय प्रमुख साधना पाटील, एस.एस.घोडके आर.एन.पाटील, सुहास नाईक यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय गणितोत्सवाची माहिती सांगितली.राष्ट्रीय गणितोत्सवानिमित्ताने विद्यालयात रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

# कळंबोली बनतेय हातगाड्यांचे शहर ; अतिक्रमण विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

## बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नावाने लागतात हातगाड्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेने अतिक्रमणमुक्त शहर बनविण्यासाठी डॉ. गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार कंबर कसली असून त्याप्रमाणे पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील पनवेल शहर, नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली, तळोजा, खारघर परिसरात प्रभाग समिती अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत वेळोवेळी फिरत्या हातगाड्या व अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जातो. अनेकदा प्रभाग अधिकारी व अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांवर हफ्तेखोरीचे आरोप देखील काही व्यासायिकांनी लावले व त्यानंतर कर्तव्यदक्ष आयुक्त गणेश देशमुख यांनी काही अधिकाऱ्यांच्या बदल्या देखील केल्या होत्या.





मात्र आता पुन्हा कळंबोली परिसरात फिरत्या हातगाड्या, आईस्क्रीमच्या गाड्या, फळे व भाजी विक्री करणारे टेम्पो, खाद्यपदार्थांच्या गाड्या खुलेआम लागत असून अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येते तसेच अतिक्रमण विभागाचे अधिकारी कारवाईमध्ये देखील दुजाभाव करीत असून कळंबोलीतील प्रकल्पग्रस्त लोकांच्या गाड्या लावू नये यासाठी प्रयत्न करत असून इतर राज्यातून आलेल्या लोकांच्या गाड्या कशा ला-गतील याकडे अधिक लक्ष देत आहेत तसेच अधिक माहिती घेताना या गाड्या कोणाच्या आहेत असे विचारले असता पनवेलमहापालिकेतून बदली होऊन गेलेल्या काही अधिकाऱ्यांच्या नावाने या गाड्या सुरु असल्याची माहिती काहींनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

तरी आयुक्तांनी याबाबत अधिक माहिती घेऊन अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून पुन्हा त्यांची उचलबांगडी इतर विभागात करावी अन्यथा भविष्यात याप्रकारामुळे पनवेल महानगरपालिकेचे नाव बदनाम होईल यात शंकाच नाही. आम्ही कळंबोली शहरामध्ये पूर्वीपासून राहत असून आमच्या जमिनी देखील आम्ही सरकारला दिल्या आहेत तरी आम्ही लम्हणून याठिकाणी छोटे मोठे व्यवसाय करून आमचा उदरनिर्वाह करीत आहोत

मात्र पनवेल महापालिकेचे काही अतिक्रमण विभागाचे अधिकारी हे आमच्या गाड्यांवर जाणूनबुजून कारवाई करून परप्रांतातून आलेल्या लोकांच्या गाड्या कशा लागतील याकडे अधिक लक्ष देत आहेत तरी अशा अधिकाऱ्यांच्याविरोधात आम्ही लाचलुचपत विभागाकडे पुराव्यासहित तक्रार दाखल करणार असल्याचे प्रकल्पग्रस्तांनी सांगितले.

# एकलव्यनगर (चांदे) आदिवासीवाडीवर कातकरी उत्थान अभियानाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

माणगाव तालुक्यामध्ये महाराजस्व अभियानास प्रारंभ झाला असून त्याअंतर्गत (दि.१६ डिसेंबर २०२१) रोजी माणगाव तालुक्यातील एकलव्यनगर (चांदे) आदिवासीवाडी येथे कातकरी उत्थान अभियान माणगाव उपविभागीय अधिकारी प्रशाली दिघावकर व तहसिलदार प्रियंका आयरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आले.

माणगाव तालुक्यामध्ये एकूण ९८ कातकरी वाड्या असून सुमारे २० हजार इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. या कातकरी वाड्यांमध्ये शासनाच्या सर्व योजनांची यशस्वी अंमलबजावणी करुन आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावणे, स्थलांतर रोखणे, आरोग्य विषयक जनजागृती करणे, व्यसनाधीनता, बालविवाह रोखणे तसेच रोजगार निर्मिती करुन आदिवासी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे इत्यादी व्यापक उद्देशाने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान अभियान अधिक गतिमान करण्यासाठी माण-गाव तालुक्यातील सर्वच आदिवासी वाड्यांवर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून पालक अधिकारी मार्फत वाडीचे संपूर्ण सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. प्रत्येक आदिवासी वाडीसाठी एक पालक अधिकारी नियुक्त करण्यात आला आला आहे. या अभियानाचा शुभारंभ चांदे एकलव्यनगर (चांदे) आदिवासीवाडीवर झाला असून यावेळी मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते. या शिबिरामध्ये वयाचे दाखले-६९, आधारकार्ड नोंदणी-११, वाहन परवाना-९, जॉबकार्ड-१३, शिधापत्रिकेमध्ये नाव वाढविणे-२६ इत्यादी लाभ देण्यात आले. तसेच यावेळी शासनाच्या विविध योजनांचीही माहिती देण्यात आली व उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथील वैद्यकीय अधिकारी श्री.प्रदीप इंगोले व त्यांच्या पथकामार्फत आदिवासी बांधवांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

तसेच कोविड-१९ चे १०० टक्के लसीकरण पूर्ण करण्यात आले. याप्रसंगी तालुक्यातील सर्व प्रशासकीय प्रमुख, सर्व विकासदीप संस्थेचे संचालक श्री. रिची भाऊ व समन्वयक श्री. महेश मोरे, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# म्हसळा नगरपंचायत निवडणुकीसाठी ६८.५० टक्के मतदान; शांततेत पार पडली प्रक्रिया

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगरपंचायतसाठी मंगळवारी घेण्यात आलेल्या निवडणुकीत सरासरी ६८.५० टक्के मतदरांनी मतदानाचा हक्क बजा-वला. एकूण ४९७८ पैकी ३४१० मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला.म्हसळा शहरातील एकूण बारा मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया उत्साहात आणि शांततेत पार पडली. १२ जागांसाठी ही निवडणूक होत असून एकूण ३७ उमेदवार रिंगणात आहेत. सायंकाळी साडे पाच वाजता मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली. १९ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी शहरात मोठ्या प्रमाणात पोलीसांचा तगडा बंदोबस्त होता. १२ मतदान केंद्रासाठी ८० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच शहरातील पूर्ण बाजारपेठ बंद करण्यात आली होती. राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, भाजप नेते कृष्णा कोबनाक यांनी मतदान केंद्रावर भेट देऊन परिस्थिती जाणून घेतली.

प्रत्येक मतदान केंद्रावर कोविड दक्षतेअंतर्गत मतदारांचे तापमान मोजून आर-ोग्य चाचणी करण्यात आली. मतदानासाठी मतदान केंद्रांवर सकाळपासूनच गर्दी उसळी होती.

नगरपंचायत निवडणूकीचा निकाल हा १९ जानेवारी रोजी लागणार असल्याने. सर्वच उमेदवारांना एक महिना वाट बघावी लागणार आहे.



# खालापूर नगरपंचायतीचे मतदान शांततेत पार ; ८४ .६६ टक्के

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर नगरपंचायतीच्या एकूण १७ प्रभागा पैकी १६ प्रभागात झाली असून या प्रभागातील ४५ उमेदवारांचे भवितव्य नगरपंचायतीमधील एकूण मतदार ४९६८ स्त्रीया - २५२८, पुरूष - २४४० होते. मंगळवारी दिवस भरात ४२०६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे एकूण ८४.६६ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावल्याने आता लक्ष एक नंतर लागणाऱ्या निकालाकडे लक्ष लागले आहेत.

मंगळवारी सकाळी ७ ३० ते सायंकाळी ५ ३० या वेळात खालापूर नगरपंचयतीच्या १६ प्रभागात मतदान प्रक्रिया पार पडली सकाळी मतदारांचा उत्साह मंदावलयाचे पहायला मिळाला उमेदवारांनाही याची चिंता जाणवत होती. सकाळी ४ तासात ११ .३० या वेळेत मतदान करणाऱ्यांची टक्केवारी ३७ .०६ टक्के इतकी होती म्हणजे यावेळी १८४१ मतदारांनी आपल्या मतदानाचा अधिकार बजावलेला होता. यामध्ये ८९७ स्त्रीयांनी म्हणजे यावेळी स्त्रीयांचे मतदान ३५ .४८ टक्के इतके झाले होते. तर ९४४ पुरूषांनी म्हणजे यावेळी पुरूषांचे ३८.६९ टक्के इतके मतदान झाले होते. दुपारी १ : ३०. वाजेपर्यंत हेच मतदान ५९ .१२ टक्के इतके झाले. यात १५१६ स्त्रीयांनी तर १४२१ पुरूषांनी आपला हक्क बजावला होता. यावेळी एकूण २९३७ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला होता. नंतर ३ .३० वाजेपर्यंत ७४.७० टक्के म्हणजे ३७११ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला होता. यात १९०० स्त्रीया व १८११ पुरूषांनी मतदान केले होते. सायंकाळी मतदान संपल्यावर एकूण ४९६८ मतदारांपैकी ४२०६ मतदारांनी आपल्या मतदानाचा अधिकार बजिवला होता. यामध्ये २१०५ स्त्रीया तर २१०१ पुरुष यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे.म्हणजेच ८४.६६ टक्के मतदारानी आपला हक्क बजावला आहे.

# घरफोडी करणाऱ्या दोघांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुरु गोविंद वाघे (वय ३५, वलप, आदिवासीवाडी), आणि शरद घनश्याम साहू (वय ४०, गणेशनगर मुळगाव ओडिसा) अशी आरोपींची नावे आहेत.

वलप येथील अजिंक्य बॅटरी फार्म येथे पत्र्यावरून चोरटे चढले. आणि त्यांनी तेथील शिसाच्या प्लेट, चांदीची मूर्ती, दोन मोबाईल आणि टीव्ही असा एक लाख ३७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक एसपी गळवे, पोलीस हवालदार महेश धुमाळ, सुनील कुदळे, प्रवीण पाटील, पोलीस नाईक प्रकाश मेहेर, पंकज चंदेले यांनी सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदार यांच्यामार्फत आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली. यावेळी बाबा ढाबा, हेदुटने फाटा येथे गुरु गोविंद वाघे आणि शरद साहू याला पोलिसांनी अटक केली. यावेळी आरोपींकडून पोलिस तपासात दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

वलप येथील अजिंक्य बॅटरी फार्म मधील १ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तर केळवणे गावात शरद साहू याने केलेल्या चोरीत ११ हजार ५०० रुपयांचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. तर तिसऱ्या गुन्ह्यात कसळखंड येथील चोरी मध्ये शरद साहू आणि अन्य एका आरोपीचा समावेश आहे.

या गुन्ह्यांमध्ये १३ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तिसऱ्या गुन्ह्यातील आणखी एक आरोपी फरार आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे.